नियमित फौजदारी केस नं. ३४/२०२४
नि. क्र. ७४

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – गणेश सखाराम दळवी,

**वय**– ३७ वर्षे, **व्यवसाय** – मजूर,

**राहणार** – निवधे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

**०१.** दिनांक २०/११/२०२३ रोजी आमच्या गावचे पोलीस पाटील संतोष चव्हाण यांनी मला बोलावून घेवून श्री मार्लेश्वर देवस्थान, मारळ येथे नेले होते. पंच म्हणून हजर राहण्यासाठी त्यांनी मला तिकडे नेले होते. त्यावेळी तेथे पोलीस व मंगेश कामतेकर हे देखील हजर होते. पोलीस तेथे चौकशीसाठी आले होते. मी तेथे थोड्या अंतरावर थांबलेलो होतो. त्यामुळे पोलीसांनी नेमके तेथे काय केले, हे मला माहित नाही. सदरची वेळ सायंकाळी ०५.३० ते ०६.०० नंतरची होती.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी किरण संतोष गुरव यांनी तेथे आम्हाला घटनास्थळ दाखविले होते. मी सुरेश गुरव यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, सुरेश गुरव यांनी तेथे योगिता गुरव व तेथे असलेल्या व्यक्तींना शिवीगाळ केली होती, असे किरण गुरव याने तेथे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, शिवीगाळ का केली अशी विचारणा केली असता सुरेश गुरव यांनी योगिता गुरव व वासंती गुरव यांना तेथे धकलाबुकल केली होती व त्यामुळे तेथे वासंती गुरव यांचा पाय मुरगळला होता, असे

किरण गुरव यांनी तेथे सांगितले होते.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, सदरचे ठिकाण हे श्री मार्लेश्वर देवस्थान, मारळ मंदिराकडे जाणारे पाखाडी असून समोर शेळके यांचे दुकान व मागील बाजूस रेलींग व डोंगर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी साक्षीदार यांनी सर्व आरोपी हे निवधे गुरववाडी येथे निघून गेल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी, पंच व पोलीस सरकारी वाहनातून निवधे गुरववाडी येथे जाऊन योगिता गुरव हिच्या घरासमोर गेलो होतो. हे मी पाहिले नाही की, त्यावेळी तेथे घराच्या बाहेर किरण गुरव व योगिता गुरव हे दोघे हजर होते. हे मी पाहिले नाही की, त्यावेळी किरण गुरव यांनी तेथे घटनास्थळ दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी किरण गुरव यांनी तेथे आम्हाला सांगितले होते की, सदर घराच्या पायरी जवळ आलेवेळी सुरेश गुरव, त्याची पत्नी, आई व मुलगा यांनी फिर्यादी व त्यांचे कुटुंबीयांना कोयतीचा धाक दाखवून *''सोडणार नाही''*, अशी धमकी दिली होती व त्यावेळी यशवंत गुरव, परेश गुरव, महेश गुरव यांनी प्रोत्साहन दिले होते.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी श्री मार्लेश्वर मंदिर व निवधे गुरववाडी येथील फिर्यादीच्या घरासमोर पोलीसांनी पंचनामा केला होता व नकाशा देखील रेखाटला होता. साक्षीदार सांगतो की, आम्ही श्री मार्लेश्वर मंदिरामध्ये सह्या केल्या होत्या. सही करण्यापूर्वी मी त्यामधील मजकूर वाचला नव्हता. पोलीसांनी तेथे छायाचित्रे काढली होती का, हे मला आता आठवत नाही. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली.) त्यामध्ये मी, पोलीस, मंगेश कामतेकर व किरण गुरव असे दिसून येत असून अनुक्रमांक ०४ कडील छायाचित्रात सही करताना दिसून येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनुक्रमांक ०५ कडील छायाचित्र हे श्री मार्लेश्वर मंदिराकडील असून त्यामध्ये मी, पोलीस, मंगेश कामतेकर व किरण गुरव असे दिसून येत आहोत व अनुक्रमांक ०६ कडील छायाचित्रात पोलीस लिखाण करताना दिसून येत*

आहेत.

**०५**. हे म्हणणे खरे आहे की, सर्व आरोपी माझ्याच गावचे रहिवासी असून मी त्या सर्वांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना ओळखत असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. आज रोजी न्यायालयात केवळ सुरेश गुरव व परेश गुरव हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस.सी.आठल्ये यांच्याकडून</u> –**

**०६**. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील यांनी मला पंचनाम्यावर फक्त सही करण्यासाठी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये काय मजकूर नमूद केला आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तो मजकूर संपूर्ण वाचून पाहिलेला नसल्याने मला तो सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी फक्त सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, छायाचित्रे घेण्यासाठी मला उभे राहण्यासाठी सांगितल्याने मी तेथे उभा राहिलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरची छायाचित्रे किती तारखेला, कधी व कोठे घेण्यात आली, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहनाने कोणत्या कामासाठी गेलो होतो हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.13 18:06:02 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १२.०८.२०२६

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख

जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. A. Shivalkar. |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) &<br>Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 12/08/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 12/08/2026 |
| Evidence uploaded on | :- | 13/08/2026 |